वर्ष-०९ अंक-४४ मुंबई, मंगळवार १९ ते २५ सप्टेंबर - २०२३ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 सोयाबीन पिवळं पडतंय का?

3 → भारतीय ज्ञान परंपराच्या समावेशाचे स्वागतच हवे!

बांगलादेशीं नागरिकांची घुसखोरी थांबेना ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com




## गणेशोत्सवात चंद्रयान, शिवराज्याभिषेक सोहळा आणि राम मंदिराच्या प्रतिकृती

मुंबई : चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील पृष्ठभागावर अलगदपणे चंद्रयान उतरले आणि आणि भारताची चंद्रयान – ३ मोहीम यशस्वी झाली, तसेच शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ३५० वे वर्ष आहे. या सर्व घटनांचे पडसाद मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवात दिसत आहेत. मंडळांनी या घटनांवर आधारित देखावे साकारले आहेत. गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही राममंदिराच्या प्रतिकृती साकारण्यास मंडळांनी पसंती



दिली आहे, तसेच श्रीरामरूपी गणेशमूर्तीही घडविण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून 'लालबागचा राजा' सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा दिवंगत कलादिग्दर्शक नितीन देसाई यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा देखावा साकारला आहे. हे मंडळ यंदा ९० वे वर्ष साजरे करीत आहे. ...पान २ वर...

## पोलिसांनी पकडला दीड कोटीचा गुटखा; 200 गोण्या जप्त



बुलडाणा : जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर मलकापूर नजीक जवळपास दीड कोटीचा प्रतिबंधित संशयास्पद गुटखा पोलिसांनी पकडला आहे. ही कारवाई आज (बुधवारी) करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्गावरून हॉटेल खालसाजवळ पोलिसांना एका बंद कंटेनरमधून ...पान २ वर...

## अंडरवर्ल्ड च्या मदतीने पाकिस्तानातही बेटींग ॲप; पाकिस्तान पाठवलेल्या रकमेबाबत ईडीकडू न तपास



मुंबईः पाच हजार कोटींची उलाढाल असलेल्या महादेव ऑनलाइन बुक बेटिंग ॲपचा प्रवर्तक सौरभ चंद्राकर अंडरवर्ल्डच्या मदतीने पाकिस्तानातही बेटिंग ॲप चालवत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच पाकिस्तानात ॲप तयार करण्यासाठीची रक्कम भारतातून हवाला ...पान २ वर...

## चॉकलेटच्या बहाण्याने चिमुरडीवर अत्याचार करून हत्या, पोलीसांनी वेषांतर करून बिहारमध्ये जाऊन नराधमाला ठोकल्या बेड्या



ठाणेः भिवंडी शहरात एका सहा वर्षीय चिमुरडीला चॉकलेट देण्याच्या बहाण्याने तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिची हत्या करून मृतदेह प्लास्टिकच्या बादलीत कोंबून फरार झालेल्या नराधमाला पोलीस पथकाने फिल्मी स्टाईलने पकडले. बिहारी पद्धतीने वेषांतर करून त्याला बिहार मधील नवाद गावातून बेड्या ठोकल्या आहेत. सलामतअली आलम अन्सारी (वय 32, रा. नवाद,बिहार) असे अटक केलेल्या नराधमाचे नाव आहे. विशेष म्हणजे पोलीस पथक आपल्या मागावर गावात असल्याची कुणकुण नराधमाला लागल्याने ...पान २ वर...

## प्रायव्हेट पार्ट मध्ये लपवून दोन किलो सोन्याच्या पेस्टची तस्करी, विमानतळावरून दोघांना अटक



नागपूर : सोने तस्करीचा एक अत्यंत धक्कादायक प्रकार आज समोर आलाय. दोन तरुणांनी दुबई येथून स्वतःच्या प्रायव्हेट पार्टमध्ये २ किलो सोन्याची पेस्ट लपवून आणल्याचे नागपूर विमानतळावर तपासणी दरम्यान उघडकीस आलीय. शाहीद नालबंद व पीरबाबा कलंदर बाबूसा सौदागर असे आरोपींचे नावं आहे. ते दोघेही कर्नाटक राज्यातील ...पान २ वर...



पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार १९ ते २५ सप्टेंबर - २०२३

# सूक्ष्म जीवाणू व जमिनीचा पोत



**सूक्ष्म जीवाणूंच्या वाढीस पोषक असणाऱ्या जमिनीच्या पोताचा व सेंद्रिय पदार्थाचा ऱ्हास यांच्या संबंधाचा विचार केला तर भारी जमिनीपेक्षा हलक्या व जमिनीत ऱ्हास अधिक होतो. याचे कारण म्हणजे हलक्या जमिनीत हवा खेळती राहते व त्यामुळे कुजण्याचा वेग वाढतो. याउलट भारी जमिनीत हवा खेळती राहण्यास प्रतिबंध होतो व कुजण्याचा वेग मंदावतो. याशिवाय भारी जमिनीत सेंद्रिय पदार्थ व त्यांच्या ज्वलनातून निर्माण झालेले उपपदार्थ चिकणमातीच्या कणांवर स्थिर राहिल्याने त्यांचा ऱ्हास कमी होतो.**

हवा जितकी अधिक खेळती राहील तितका सेंद्रिय कर्बाचा कुजण्याचा वेग जास्त राहतो. या बाबींचा संबंध जमिनीच्या मशागतीच्या प्रकाराशीही जवळचा आहे. जितकी मशागत जास्त तितकी जमिनीत खोलवर हवा खेळती राहून सेंद्रिय कर्बाचा ऱ्हास झपाट्याने होतो. त्यामुळे सेंद्रिय कर्बाचा ऱ्हास कमी करण्यासाठी जमिनीच्या मशागतीची पातळी किमान व हलक्या स्वरुपाची ठेवणे अधिक श्रेयस्कर ठरेल.

विशेषत: ही बाब हलक्या ते मध्यम जमिनीत अधिक कटाक्षाने लक्षात ठेवली पाहिजे.

**सूक्ष्म जीवाणू व जमिनीचा पोत:**

जमिनीचे तापमान हा दुसरा घटक आहे. तापमान जितके जादा तेवढा सेंद्रिय पदार्थांचा ऱ्हास अधिक होतो.

काही शास्त्रज्ञाने सेंद्रिय पदार्थांच्या कुजण्याचा वेग ठरवणाऱ्या अनेक घटकांचा व त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की, एखाद्या भौगोलिक स्थानाचे सरासरी तापमान १० अंश सेल्सिअसने वाढले तर सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग कमी करण्यासाठी जमिनीवर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन व ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करता येतो. परंतु ही व्यवस्थापन पद्धती सर्व ठिकाणी अधिक असलेल्या जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे तापमानाचे नियमन तर आहेच, परंतु त्याशिवाय तेथे सेंद्रिय पदार्थांची निर्मितीही फार मोठ्या प्रमाणात होत असते.

सेंद्रिय पदार्थातील कर्बाचे गुणोत्तर जेवढे कमी तेवढा सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग अधिक आढळून येतो. म्हणूनच द्विदलवर्गीय पिकांचे अवशेष हे एकदल पिकांच्या तुलनेने लवकर कुजतात व पर्यायाने सेंद्रिय पदार्थांचा वेगाने ऱ्हास होतो. म्हणून कर्ब: नत्राचे वेगवेगळे गुणोत्तर असणारे शेतातच उपलब्ध होणारे सेंद्रिय पदार्थ वापरल्यास कर्बाची पातळी बऱ्यापैकी राखण्यास मदत होते.

जमिनीत प्रत्येक प्रकारच्या वनस्पतीच्या मुळाभोवती विशिष्ट प्रकारच्या जीवाणूंच्या प्रजाती अधिक प्रमाणात व प्रभावीपणे कार्यरत असतात. म्हणून हिरवळीच्या पिकांमध्ये वेगवेगळ्या पिकांचा समावेश करावा.

शेतीमध्ये सेंद्रिय पदार्थांची उपलब्धता वाढविण्यासाठी वेगवेगळ्या उंचीची विविध मोसमात फुलांवर व फळांवर येणारी सदाहरित तसेच पानगळ होणारी यांचे सुयोग्य मिश्रण असणारी वृक्षराजी वनशेती पद्धतीच्या माध्यमातून निवडणे हितावह होईल.

**सूक्ष्म जीवाणूंची कार्ये:**

टाकाऊ सेंद्रिय पदार्थ व त्यांचे अवशेष कुजविणे.

हवेतील नत्राचे जमिनीत स्थिरीकरण करणे.

वनस्पतीतील अन्नद्रव्यांचे चक्रीकरण करून त्यांची उपलब्धता वाढविणे.

संप्रेरकाची निर्मिती करून अविद्राव्य अन्नद्रव्यांचे रुपांतर विद्राव्य स्वरुपात करून त्यांची उपलब्धता वाढविणे.

# ऊस: पोक्का बोंग रोग नियंत्रण

**उसावर पोक्का बोंग हा बुरशीजन्य रोग असून, फुर्जेरियम मोनिलीफॉरमी या हवेद्वारे पसरणाऱ्या बुरशीमुळे होतो. कोसी- ६७१, को- ८६०३२, कोएम- ०२६५, को- ८०१४, को- ९४०१२, कोव्हीएसआय- ९८०५, व्हीएसआय- ४३४, को- ७५२७, को- ७२१९ आणि को- ४१९ या ऊस जाती या रोगास कमी-अधिक प्रमाणात बळी पडतात. उन्हाळा हंगाम संपतेवेळी पडणाऱ्या वळीव पावसानंतर या रोगाची लागण ऊस पिकामध्ये दिसून येते.**



पावसाळी हंगामात पडणाऱ्या सततच्या पावसामुळे आणि शेतात पाणी साचल्याने पिकांमध्ये सापेक्ष आर्द्रता वाढते, तापमान कमी होते. अशा परिस्थितीत या रोगाची बुरशी कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढून रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. राज्यातील सर्व कृषी हवामान विभागांत या रोगाचा प्रादुर्भाव कमी-अधिक प्रमाणात आढळतो.

दक्षिण महाराष्ट्रात मात्र पावसाळा हंगामात सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण हवेत जास्त काळ राहिल्याने या रोगाचे प्रमाण जास्त दिसून येते.

**रोगाची लक्षणे :**

पावसाळा हंगाम सुरू झाल्यानंतर किंवा पावसाळा हंगामापूर्वी पडलेल्या वळीव पावसामुळे हवेत आर्द्रता वाढते. त्या वेळी पोक्का बोंग या रोगास कारणीभूत असणाऱ्या फुर्जेरियम मोनिलीफॉरमी या हवेद्वारे पसरणाऱ्या बुरशीची लागण उसाच्या शेंड्याकडील कोवळ्या पानांवर दिसून येते.

सुरुवातीस पोंग्यातील तिसऱ्या व चौथ्या पानांच्या बेचक्यात (पानाच्या व देठाच्या जोडाच्या ठिकाणी) पांढरट- पिवळसर पट्टे दिसून येतात. रोगाची लागण झालेल्या पानांवर सुरकुत्या पडून पाने आकसतात; तसेच त्यांची लांबी घटते. रोगाची तीव्रता वाढल्यानंतर उसाची पाने सडतात, कुजतात. यानंतर पाने गळून पडतात किंवा एकमेकांत गुरफटतात.

पाने गुरफटल्याने कांड्यांचे पोषण होत नसल्याने कांड्या आखूड व वेड्यावाकड्या होतात. कधी रोगाची तीव्रता वाढल्यावर पोंगा मर किंवा शेंडाकूज दिसून येते. काही वेळेस रोगग्रस्त उसाच्या कांड्यांवर कांडी काप (नाइट कट) रोगाची लक्षणे दिसून येतात. शेंडाकूज व कांडी काप (नाइट कट) झालेल्या उसातील शेंडा जोम नष्ट झाल्याने उसावरील डोळ्यातून पांगशा फुटतात, कालांतराने असे ऊस वाळतात. रोगट उसाच्या कांड्या आखूड झाल्याने व पांगशा फुटलेल्या उसाच्या उत्पादनात घट येते. रोगामुळे उसाच्या बेटातील रोगग्रस्त उसाचेच नुकसान होते. रोगाने बाधित न झालेल्या उसाचे नुकसान होत नाही.

**रोगाचा प्रसार :**

पोक्का बोंग या रोगाचा प्रसार प्रामुख्याने हवेमार्फत होतो. याशिवाय पाणी, पाऊस व कीटकांद्वारेदेखील या रोगाचा प्रसार होतो; मात्र रोगाचा प्रसार बेण्याद्वारे होत नाही. अशा पध्दतीने उसावरील पोक्का बोंगा रोगाचा प्रादुर्भाव टाळता येतो. त्यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळते.

# कांदा लागवड तंत्रज्ञान

**महाराष्ट्र हे भारतात कांदा उत्पादनात पहिल्या क्रमांकावरील राज्य आहे. परंतु, हवामानातील अनपेक्षित बदल आणि शेतकऱ्यांकडे कांदा साठवणीची नसलेली सोय ह्यामुळे बऱ्याच वेळा कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडतात. कांदा लागवड व कांद्यावरील रोग व किडींचे नियंत्रण ह्याबद्दल जाणून घेऊ..**



कधी शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणणारा तर कधी ग्राहकांच्या डोळ्यात पाणी आणणारा कांदा.. कांदा हा संपूर्ण भारत देशात दररोज आहारात वापरला जातो. त्यामुळेच कांद्याची मागणी ही वर्षभर मोठ्या प्रमाणात असते. परंतु, बऱ्याच वेळा मागणी आणि पुरवठ्यामध्ये झालेल्या तफावतीमुळे कांद्याचे भाव हे बाजारात अस्थिर असतात.

**हवामान व लागवड हंगाम:**

रब्बी हंगामात कांद्याची लागवड करणे हे जास्त फायद्याचे ठरते. कांदा लावल्यापासून काही दिवस कांद्याला थंड हवामान हवे असते तर त्यानंतर कांद्याची वाढ होताना हवामानातील तापमान हे थोडे जास्त असेल तर कांद्याच्या कंद वाढीला त्याचा फायदा होतो. त्यामुळे नोव्हेंबरच्या आस-पास लागवड केली तर त्यावेळच्या थंडीचा उपयोग होतो आणि जानेवारीतील सूर्यप्रकाशामुळे कांदा चांगला पोसतो. त्याचसोबत खरीप व उन्हाळी हंगामात देखील लागवड केली जाते.

**जमीन व पूर्वमशागत:**

कांदा लागवडीसाठी मध्यम ते कसदार जमीन उपयुक्त ठरते. जमीन पाण्याचा निचरा करणारी असावी. जमीन तयार करताना जमिनीची उभी आडवी नांगरणी करून कुळवाच्या पाळ्या देऊन ढेकळे फोडून घ्यावीत. जमिनीत एकरी १५ टन शेणखत टाकावे.

**वाण व बियाणे :**

**बसवंत ७८० :** खरीप व रब्बी हंगामासाठी ही जात योग्य असून या जातीचा रंग गडद लाल असतो. कांदे आकाराने मध्यम ते मोठे असतात. ही जात १०० ते ११० दिवसात तयार होते. हेक्टरी उत्पादन २५० क्विंटल मिळते.

**एन - ५३ :** ही जात खरीप हंगामासाठी योग्य. १०० ते १५० दिवसांत तयार. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल मिळते.

**एन- २-४-१ :** ही जात रब्बी हंगामासाठी योग्य असून रंग भगवा व विटकरी आहे. साठवणुकीत हा कांदा चांगल्या प्रकारे टिकतो. ही जात १२० ते १३० दिवसांत तयार होते. हेक्टरी ३०० ते ३५० क्विंटल मिळते.

एकरी कांद्याचे ४ ते ४.५ किलो बियाणे आवश्यक असते.

**लागवड कशी काल?**

कांदा लागवड ही वाफा पद्धतीने किंवा सरी पद्धतीने करू शकतो. पण त्याआधी कांद्याची रोपे तयार करणे महत्त्वाचे आहे. गादी वाफे तयार करून त्यामध्ये कांद्याची रोपे तयार करावीत. १ मीटर रुंद, ३ मीटर लांब, १५ सेमी उंच वाफे बनवावेत. ह्या वाफ्याच्या रुंदीशी समांतर अशा ५ सेमी बोटाने रेषा पाडाव्यात आणि यात बी ओळीत पातळ पेरावे व नंतर मातीने झाकून टाकावे. रोपांना हरभऱ्याच्या आकाराची गाठ तयार झाली की ते लागवडीसाठी तयार आहेत असे समजावे. त्यानंतर वाफा पद्धतीने किंवा सरी पद्धतीने लावावीत.

**खते व पाणी व्यवस्थापन:-**

कांदा पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश लागवडीच्या वेळी घ्यावे. त्यानंतर १ महिन्याने ५० किलो नत्र प्रतिहेक्टरी द्यावे. कांदा पिकाला नियमित पाणी देणे महत्त्वाचे असते.

**काढणी व उत्पादन:-**

लागवडीनंतर ३ ते ४.५ महिन्यात कांदा काढणीस तयार होते. कांद्याची पात पिवळी व मान आडवी पडली की कांदा काढणीस आला असे समजावे. हेक्टरी उत्पादन २५० ते ३०० क्विंटल मिळते.



# जनावरांतील त्वचा आजारांवर उपाय

**जनावरे त्वचेच्या विविध आजारांमुळे प्रभावित होऊ शकतात. यातील काही आजार हे जीवाणू, बुरशी, परजीवी आणि विषाणूंमुळे होतात. काही आजार पर्यावरणीय घटकांमुळे किंवा पौष्टिक अन्न घटक कमतरतेमुळे होतात.**



**मेंज/ खरूज संसर्ग :** मेंज सूक्ष्म कीटकांमुळे होतो. सारकॉप्टिक मेंजमुळे तीव्र खाज सुटते आणि केस गळतात. कोरिओप्टिक मेंज प्रामुख्याने खालच्या पायांवर परिणाम करते. उपचारांमध्ये ॲकॅरिसाइड्स आणि स्वच्छता यांचा समावेश आहे.

**बोवाइन पॅप्युलर स्टोमाटायटीस:** विषाणूजन्य आजारामुळे तोंडावर आणि तोंडाभोवती लहान, उंचावलेले आणि लाल पुरळ येतात. हा आजार स्वयं- मर्यादित असतो. उपचारांशिवाय बरा होतो.

**उवांचा प्रादुर्भाव:** उवांच्या विविध प्रजातींचा प्रादुर्भाव होऊ शकतो, यामुळे खाज सुटणे, केस गळणे आणि त्वचेची जळजळ होऊ शकते. जनावरांची स्वच्छता ठेवावी.

**जीवाणूंमुळे होणारे आजार:** त्वचारोग आणि स्टेफिलोकोकल त्वचा आजाराचे संक्रमण होऊ शकते.

**उपचार :** जनावरांची चांगली स्वच्छता ठेवावी. तातडीने औषधोपचार करावेत.

**फोटोसेन्सिटायझेशन (प्रकाशसंवेदी आजार):** जेव्हा जनावरे विशिष्ट वनस्पती किंवा रसायने खातात, त्यामुळे त्यांची त्वचा सूर्यप्रकाशासाठी अधिक संवेदनशील होते. तेव्हा फोटोसेन्सिटायझेशन होऊ शकते. आजारामुळे तीव्र सनबर्न, फोड आणि त्वचा सोललेली दिसते.

**उपचार:** आहारातून अपायकारक घटक काढून टाकावेत. जनावरे सावलीत बांधावीत.

**मस्सा/वार्ट (पॅपिलोमा):** बोवाईन पॅपिलोमाव्हायरस विषाणूमुळे हा आजार दिसतो. मस्सा हे सामान्यत: लहान असतात. त्वचेवर वाढतात. यावर पशुतज्ज्ञांकडून योग्य उपचार करणे गरजेचे आहे.

**ॲलर्जीक प्रतिक्रिया:** जनावरांना विशिष्ट वनस्पती, कीटक किंवा पर्यावरणीय घटकांमुळे त्वचेची ॲलर्जी होऊ शकते. यामुळे पित्ती, खाज सुटणे आणि लालसरपणा येतो.

**उपचार :** ॲलर्जी निर्माण करणारे घटक ओळखावेत.

**पौष्टिक अन्न घटक कमतरता:** खराब पोषणामुळे केस गळतात. त्वचेचे आजार वाढतात. पुरेशी जीवनसत्त्वे आणि खनिजयुक्त संतुलित आहार द्यावा.

**लाळ्या खुरकुत :** हा विषाणूजन्य आजार आहे. संसर्गामुळे तोंडात, आजूबाजूला आणि पायांवर द्रव भरलेले फोड होतात जे फुटून जखमा होतात, परिणामी खाण्यास किंवा हालचाल करण्यास अनिच्छा निर्माण होते. लसीकरण हा योग्य उपाय आहे. आजारी जनावरांची चांगली स्वच्छता ठेवावी. तातडीने पशुवैद्यकाकडून उपचार करावेत.

## पोलिसांनी पकडला दीड

गुटखा तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाईकरण्यात आली. दरम्यान मलकापूर शहर पोलीस ठाणे आणि अधिकाऱ्यांनी यात सहभाग घेतला. हा कंटेनर (क्रमांक 019196) हुबळी वरून भिवंडी येथे जात होता. तो खालसा ढाब्यावर उभा असल्याचे पोलिसांना दिसून आले. त्यानंतर कंटेनर उघडले असता त्यातील गोणींमधून प्रतिबंधित गुटख्याच्या जवळपास 190 पेक्षा अधिक गोण्या दिसून आल्या. कारवाईची कुणकुण लागताच कंटेनरचा ड्रायव्हर कंटेनर सोडून फरार झाला. (Gutkha seized) एकंदरीत कंटेनर्स व मालाची अंदाजित किंमत दीड कोटी सांगितले जात आहे. अशा मोठ्या कारवाईमुळे संपूर्ण पोलीस प्रशासन अलर्टवर आले आहे. प्रकरणाच्या खोलात जाऊन चौकशी केल्यास तस्करीमागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याची शंका वर्तविण्यात आली आहे.

## गणेशोत्सवात चंद्रयान, शिवराज्याभिषेक

गणेशगल्लीतील लालबाग सार्वजनिक उत्सव मंडळाने यंदा स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडची प्रतिकृती साकारलेली आहे. गिरणगावातील जुन्या मंडळांपैकी एक असलेल्या चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाची गणेशमूर्ती यंदा 'श्रीराम रूपी' अवतारात आहे. 'चिंचपोकळीचा चिंतामणी' या नावाने हा गणपती ओळखला जात असून हे मंडळ यंदा शतकोत्तर चतुर्थ वर्ष साजरे करीत आहे. त्याचबरोबर पर्यावरणपूरक वस्तूंनी तयार करण्यात आलेला लालबागमधील 'राजा तेजुकायाचा'ही यंदा 'श्रीराम रूपी' अवतारात आहे. गिरगावातील खेतवाडी ११ वी गल्ली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती तब्बल ४५ फुटांची आहे. 'चंद्रयान – ३' मोहिमेचे देखावेही अनेक मंडळांनी साकारले आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांप्रमाणे घरगुती गणेशोत्सवावरही या ऐतिहासिक घटनांची छाप पडलेली पाहायला मिळत आहे. घरगुती गणेशमूर्तीही रामाच्या रुपात दिसत आहेत. ३६०.४० कोटींचे विमा संरक्षण मुंबईतील सगळ्यात श्रीमंत गणपतींपैकी एक म्हणून किंग्स सर्कल येथील गौड सारस्वत ब्राह्मण म्हणजेच 'जीएसबी' सेवा मंडळाचा गणपती ओळखला जातो. यंदा गणेशमूर्ती ६६.५ किलोग्रॅम सोन्याचे दागिने आणि २९५ किलोग्रॅम चांदी तसेच इतर मौल्यवान वस्तूंनी सजलेली असेल. मंडळाने यंदाच्या वर्षी तब्बल ३६० कोटी ४० लाखांचा विमा काढला आहे. सुरक्षा व्यवस्थापनाचा भाग म्हणून मंडपात जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे आणि प्रथम दर्शनी चेहरा कैद करणारे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर भाविकांसाठी पूजा आणि इतर सेवांसाठी मंडळाकडून 'क्यू आर कोड' स्कॅनिंगची व डिजिटल लाईव्ह यंत्रणा सुविधा सुद्धा उपलब्ध करण्यात आली आहे, असे मंडळाकडून सांगण्यात आले.

## अंडरवर्ल्ड च्या मदतीने

मार्फत पाठवण्यात आला असून त्याबाबत सध्या सक्तवसुली संचालनालय (ईडी) तपास करत आहे. चंद्राकरच्या लग्नात भारतातील चित्रपटसृष्टीतील अभिनेते व गायकांप्रमाणे पाकिस्तानतूनही काहीजण सहभागी झाले होते. ते पाकिस्तानातील बेटिंग ॲपशी संबंधीत व्यक्ती असल्याचा ईडीला संशय आहे. दाऊद इब्राहिमचा भाऊ अनीसने १९९९ मध्ये भारतीय गुटखा व्यावसायिकांच्या मदतीने पाकिस्तानात फायर गुटख्याचा कारखाना सुरू केला होता. हे प्रकरण खूप गाजले होते. या प्रकरणाप्रमाणेच २०२१ मध्ये महादेव ऑनलाईन बुक बेटिंग ॲपच्या प्रवर्तक सौरभ चंद्राकर व भागिदार रवी उप्पल अंडवरल्डच्या मदतीने पाकिस्तानात बेटिंग ॲप सुरू केल्याची माहिती ईडीला मिळाली आहे. पाकिस्तानात स्थानिक नावाने सुरू करण्यात आलेल्या या ॲपने गेल्या दोन वर्षात मोठी कमाई केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्याला अंडरवर्ल्डकडून संरक्षण मिळत आहे. त्यामुळे कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिष्णोईने चंद्राकरकडे खंडणीची मागणी केली होती. त्यावेळी चंद्राकरने त्याला धुडकावून लावले होते. या संपूर्ण प्रकरणात मदत करणारा दाऊद इब्राहिम असल्याचा संशय ईडीला आहे. त्याबाबत सध्या सखोल तपास सुरू आहे. ईडीने मेसर्स महादेव ऑनलाइन बुक बेटिंग ॲप संबंधित प्रकरणात कोलकाता, भोपाळ व मुंबई येथील ३९ ठिकाणी छापे टाकले होते. याप्रकरणी सुमारे ४१७ कोटी रुपये किंमतीची मालमत्ता गोठवण्यात अथवा जप्त करण्यात आल्याची माहिती ईडीकडून देण्यात आली. या कंपनीचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर याचे यूएईमध्ये फेब्रुवारी २०२३ मध्ये लग्न झाले होते. या विवाह सोहळ्यासाठी २०० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. या विवाह सोहळ्यात सादरीकरण करण्यासाठी अभिनेता टायगर श्रॉफ, नेहा कक्कर, सनी लिओनी, कृष्णा अभिषेक, राहत फतेह अली खान, विशाल ददलानी, भारती सिंह, नुसरत भरुचा, आतिफ अस्लम, अभिनेता पुलकीत,भाग्यश्री, कीर्ती खबंदा, एली अवराम हे १४ चित्रपट कलाकार सहभागी झाले होते. या कलाकारांशिवाय पाकिस्तानात सुरू करण्यात आलेल्या बेटिंग ॲपशी संबंधीत व्यक्तीही उपस्थित होते. ते पाकिस्तानातील सट्टेबाज असल्याचा ईडीला संशय आहे. दरम्यान भारतीय कलाकारांनी या लग्न सोहळ्यात कार्यक्रम सादर करण्यासाठी बहुतांश रक्कम रोखीने घेतली आहे. काही जणांनी ८० टक्के रक्कम रोखीने व २० टक्के धनादेशाद्वारे घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. त्याची सर्व माहिती ईडीच्या हाती लागली आहे. कलाकारांना मिळालेली रोख रक्कम हवाला नेटवर्कच्या माध्यमातून त्यांना मिळाल्याचा ईडीला संशय आहे. ईडीकडे या लग्नाच्या चित्रफीती आहेत. त्याद्वारे तपासणी सुरू आहे. पाकिस्तानातील ॲपमध्ये सुमारे ३०० कोटींची गुंतवणूक पाकिस्तानातील बेटिंग ॲपसाठी ३०० कोटींची गुंतवणूक करण्यात आली असून पाकिस्तानातील नफ्यातील ३० टक्के अंडरवर्ल्डला व उर्वरीत ७० टक्के चंद्राकर व साथीदारांना मिळत असल्याची माहिती आहे. पाकिस्तानातील गुंतवणूक भारतीय बेटिंग ॲपच्या नफ्यातून उभारण्यात आल्याचा ईडीला संशय आहे. त्यामुळे ही रक्कम पाकिस्तानात नेण्यासाठी कोणत्या हवाला नेटवर्कला वापर झाला, याबाबत ईडी तपास करत आहे. भारतातील या ॲपची उलाढाल पाच हजार कोटी रुपयांची आहे. पाकिस्तानातील उलाढालीबाबत सध्या ईडी तपास करत आहे.

## चॉकलेटच्या बहाण्याने चिमुरडीवर

त्याने मोबाईल बंद केला होता. त्यानंतर पोलीस पथकाने केंद्र आणि बिहार सरकारच्या योजना राबविण्याचा बहाणा करत तिशी वेशभूषा आणि बिहारी भाषा बोलून गावातील नागरिकांना योजनेच्या लाभाविषयी माहिती देत असतानाच, नराधमही या योजनेचा लाभ घेण्यासाठी येताच वेषांतर केलेल्या पोलिसांनी त्याच्यावर झडप घालून अटक केली आहे. याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात सुरवातीला अज्ञात व्यक्ती विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर अज्ञात आरोपी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला असता चिमुरडीच्या मृतदेहाचा उत्तरणीय अहवाल आल्यानंतर तिच्यावर अत्याचार झाल्याने निष्पन्न झाले. पोलिसांनी नरधामाच्या विरोधात हत्येसह अत्याचार आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस उपआयुक्त नवनाथ ढवळे यांनी दिली आहे. चॉकलेट देण्याच्या बहाण्याने अत्याचार हत्या झालेल्या मृतक चिमुरडीचे 13 सप्टेंबर रोजी आई-वडील कामासाठी निघून गेले होते. त्यावेळी सोबत तिचा नऊ वर्षाचा भाऊ घरी होता. त्यातच चिमुरडी चॉकलेटसाठी परिसरात फिरत असतानाच नराधमाने तिला चॉकलेट घेऊन देण्याच्या बहाण्याने घरात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिची हत्या करून तिचा मृतदेह बादलीत कोंबून घराला बाहेरून कुलुप लावून फरार झाला होता. दुसरीकडे चिमुरडी बेपत्ता असताना सायंकाळी आई वडील घरी आल्यानंतर मुलाने बहीण दिसत नसल्याची माहिती दिली. त्यानंतर आई-वडिलांनी परिसरात शोध घेत रात्री उशिरा भिवंडी शहर पोलीस ठाण्यात मुलीच्या हरवल्याची नोंद केली. मुलगी अल्पवयीन असल्याने पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून शोध घेण्यास सुरवात केली.

## प्रायव्हेट पार्ट मध्ये लपवून दोन

रहिवासी आहेत.नागपूर विमानतळावर आज पहाटे कतारवरून आलेल्या विमानाने दोन तरुण नागपूरला आले. त्यांच्या हालचालींवर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना संशय आला. दोघांची चौकशी करण्यात आली तेव्हा त्यांनी प्रायव्हेट पार्टमध्ये लपवून पेस्ट स्वरूपात दोन किलोहून अधिक सोन्याची पेस्ट आणल्याचं समोर आलं. दोनही आरोपींची सोन्याची पेस्ट कॅप्सूलमध्ये भरली होती. ते सोनं कॅप्सूल प्रायव्हेट पार्टमध्ये ठेवले होते. आरोपींच्या हालचालींवर संशयः दोन व्यक्ती सोन्याची तस्करी करत असल्याची माहिती कस्टम विभागाला आधीचं कळालेली होती. आरोपी शाहीद नालबंद आणि पीरबाबा कलंदर बाबूसा सौदागर विमानतळावर उतरले. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटतं असल्याने कस्टम अधिकाऱ्यांनी त्यांना थांबवून व त्यांची अंगझडती घेतली असता संशयास्पद काहीचं आढळून आले नाही.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार १९ ते २५ सप्टेंबर - २०२३


## संपादकीय...



# पोचट पंचांचे प्रजासत्ताक

निवडणूक आयुक्तांस अवनत करणारे विधेयक या अधिवेशनात मंजूर झाल्यास या आयुक्तांवर अन्य ज्येष्ठ बाबूंप्रमाणे खाविंदाचरणी मिलिंदायमान राहण्याची वेळ येईल.

''लोकशाही म्हणजे बहुमताची दडपशाही नाही,'' असे या युगाचा विख्यात लेखक, इतिहासकार युआल नोआ हरारी याने अलीकडे स्वतःच्या देशाचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांस सुनावले. संदर्भ आहे हे पंतप्रधान करू पाहतात त्या न्यायिक सुधारणा! या सुधारणांमुळे बहुमताच्या जोरावर पंतप्रधान नेतान्याहू सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांस कात्री लावण्याच्या प्रयत्नात असून त्यामुळे न्यायपालिका ही सरकारच्या हातचे निष्क्रिय, निराकार, निर्गुण बाहुले बनण्याचा धोका आहे. या लोकप्रिय आणि तरीही धीट लेखकाचे स्मरण होण्याचे प्रयोजन म्हणजे देशाच्या माजी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांस लिहिलेले पत्र. जे. एम. लिंगडोह, टी. एस. कृष्णमूर्थी, एन. गोपालस्वामी, एस. वाय. कुरेशी, व्ही. एन. संपथ, एच. एस. ब्रह्मा, सैय्यद नसीम झैदी, ओ. पी. रावत अशा अनेक निवृत्त निवडणूक आयुक्तांच्या या संयुक्त पत्रावर स्वाक्षऱ्या आहेत. आधी मुळात आपले निवृत्त का असेना सनदी अधिकारी विद्यमान सरकारच्या विरोधात एखादी भूमिका जाहीरपणे घेतात याचेच खरे तर अप्रूप. लिंगडोह, कुरेशी असे काही अपवाद वगळले तर एरवी कोणत्याही महत्त्वाच्या विषयांवर आपला अधिकारी वर्ग तसे मौन बाळगण्यातच आनंद मानतो. ते मौन सोडून इतके अधिकारी एखाद्या विषयावर एकमताने काही भूमिका घेत असतील आणि तसे सरकारला कळवत असतील तर ही घटना नुसतीच दखलपात्र ठरत नाही. तर ती भाष्ययोग्य ठरते. या प्रकरणात तर अधिकच. कारण प्रश्न आहे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास स्वतःचा कणा ताठ ठेवण्याचे स्वातंत्र्य राहणार का?

तो पडतो कारण विद्यमान सरकार मुख्य निवडणूक आयुक्ताचा, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश पदाचा दर्जा कमी करून त्यास सामान्य बाबूच्या पातळीवर आणून ठेवू पाहाते. सद्यःस्थितीत मुख्य निवडणूक आयुक्त, देशाचे महालेखापाल (म्हणजे 'कॅग') हे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश दर्जास समकक्ष आहेत. म्हणजे ही पदे घटनात्मक आहेत. याचा साधा अर्थ असा की त्यांना अन्य कोणा नोकरशहाप्रमाणे काढून टाकता येत नाही. या पदांवरील व्यक्ती नकोशा झाल्यास महाभियोग चालववा लागतो आणि ही प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची असते की तिच्या यशाचे एकही उदाहरण आपल्या प्रशासकीय इतिहासात नाही. याचाच दुसरा अर्थ असा की या पदांवर नेमल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याची हमी घटनेनेच दिली असून त्यामुळेच निवडणुका राजकीय पक्ष, विशेषतः सत्ताधीशांच्या, दबावाविना पार पाडता येतात. तथापि या पदाचे घटनादत्त स्वातंत्र्य केंद्रास मंजूर नाही, असे दिसते. कारण निवडणूक आयुक्तांस न्यायाधीशपदावरून अवनत करून 'मंत्रिमंडळ सचिव' दर्जावर आणून ठेवणारे विधेयक संसदेच्या या अधिवेशनात प्रस्तावित आहे. ते मंजूर झाल्यास निवडणूक आयुक्तांवर अन्य ज्येष्ठ बाबूंप्रमाणे खाविंदाचरणी मिलिंदायमान राहण्याची वेळ येईल. हे इतकेच नाही.

तर विद्यमान सरकार मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीची प्रक्रियाही बदलू पाहते. सद्यःस्थितीत पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांच्या समितीतर्फे मुख्य निवडणूक आयुक्त निवडले जातात. सरकारला यात सरन्यायाधीशांची उपस्थिती टोचत असल्याचे दिसते. कारण त्यांना वगळून या समितीत त्यांच्याऐवजी एक केंद्रीय मंत्री घेतला जावा, असे सरकारचे म्हणणे. यामागे गेल्या वर्षी सर्वोच्च न्यायालयाने अरुण गोयल यांच्या नियुक्तीवरून केंद्रास फटकारलेले होते, हे कारण असणार हे समजून घेण्यास राजकीय विश्लेषक असण्याची गरज नाही. त्या वेळी या गोयल यांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकार इतकी घाई करीत होते की ती पाहून सरकारच्या हेतूविषयी संशय यावा. सर्वोच्च न्यायालयाला तो आलाच. त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यावर केंद्राचे कान उपटल्यामुळे सरकारची शोभा झाली. त्यामुळे आता निवडणूक आयुक्त निवडीच्या समितीत सरन्यायाधीश नकोतच, यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.

ते यशस्वी झाले तर ही समिती पूर्णपणे सरकार-केंद्री असेल आणि विरोधी पक्षनेत्याची उपस्थिती ही केवळ दाखवण्यापुरती राहील. कारण पंतप्रधान आणि मंत्री हे एकाच बाजूला आणि दुसरीकडे विरोधी पक्षनेता. सद्यःस्थितीत असे नव्हे; एरवीही कोणता मंत्री पंतप्रधानांविरोधात भूमिका घेईल?

# मेट्रो : रुळावर कधी येणार? व्यवहार्य, तरीही तोटय़ात!



शहरी, निमशहरांतील रस्त्यांवर होणारी वाहनांची गर्दी, त्यामुळे दिवसेंदिवस उग्र होत चाललेली वाहतूक कोंडी, पार्किंग यांसारख्या समस्यांवर उपाय म्हणून मेट्रोचा पर्याय पुढे आला. अन्य साधनांच्या तुलनेत मेट्रो वाहतूक अधिक व्यवहार्य असल्यामुळे देशभरातील अनेक शहरांत मेट्रो मार्गिकांची आखणी सुरू आहे. यातील अनेक मार्ग सुरूही झाले आहेत. काही ठिकाणी त्यांना चांगला प्रतिसाददेखील मिळत आहे. मात्र, तरीही देशातील बहुतांश मेट्रो मार्ग आजही तोटय़ात आहेत. खर्च आणि उत्पन्नाचा मेळ साधू न शकलेल्या मेट्रोच्या सद्यःस्थितीचा हा वेध..

झपाटय़ाने नागरीकरण होत असलेल्या शहरांत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही वाहतूक कोंडी, प्रदूषण, पार्किंग समस्या नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक आहे. यासाठी 'बस रॅपिड ट्रान्सिट सिस्टीम' (बीआरटीएस), 'लाइट रेल ट्रान्सिट' (एलआरटी), ट्राम आणि मेट्रो रेल्वे हे चार पर्याय उपलब्ध होते. यापैकी बस रॅपिड आणि लाइट रेलसाठी लागणारी अतिरिक्त जागा लक्षात घेता हे प्रकल्प व्यवहार्य ठरणारे नाहीत. तुलनेत मेट्रो प्रकल्प हा आर्थिकदृष्टय़ा तसेच प्रवाशांच्या दृष्टीनेही व्यवहार्य ठरणारा असल्याने त्याचा स्वीकार करण्यात आला. देशात सध्या १६ शहरांमध्ये मेट्रो प्रकल्प कार्यान्वित असून, २७ शहरांमध्ये मेट्रो प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे वा प्रकल्प प्रस्तावित आहेत.

जगातील २०० पेक्षा अधिक मोठय़ा शहरांमध्ये मेट्रोचे जाळे विणलेले आहे. १८६३ मध्ये लंडनमध्ये सुरू झालेली मेट्रो ही जगातील सर्वात जुना प्रकल्प तर ७५० कि.मी.पेक्षा अधिक जाळे विस्तारलेली चीनमधील शांघाय शहरातील मेट्रो सर्वात मोठा प्रकल्प. भारतातील सध्या कार्यान्वित असलेल्या मेट्रो प्रकल्पातून ८०० कि.मी.पेक्षा अधिक मार्गिकांवर मेट्रो धावते. पण अजूनही देशात मेट्रो प्रकल्पाला पाहिजे तसा लोकांचा प्रतिसाद मिळत नाही, असा निष्कर्ष सरकारी यंत्रणांनी काढला आहे. प्रवासी संख्या आणि त्यातून भाडय़ाद्वारे मिळणारे उत्पन्न हा मेट्रोच्या महसुलाचा मुख्य मार्ग असतो. मात्र, आपल्याकडे बहुतेक सर्वच शहरांमधील मेट्रोचे नियोजन चुकल्याचे दिसते.

मोठय़ा शहरांमध्ये मेट्रोचे जाळे विणण्यावर केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारांनी भर दिला असला तरी गेल्या सहा-सात वर्षांत सुरू झालेले सर्वच मेट्रो प्रकल्प हे आर्थिकदृष्टय़ा तोटय़ात आहेत. २००६ मध्ये राजधानी दिल्लीत मेट्रो प्रकल्प प्रत्यक्ष कार्यान्वित झाला. आतापर्यंत सुमारे ४०० किमीचे जाळे विणले असून गेल्या दहा वर्षांत प्रवासी संख्येत लक्षणीय वाढही झाली आहे. दिल्ली मेट्रो प्रकल्प कार्यात्मकदृष्टय़ा (ऑपरेशनल) फायद्यात असला तरी सुरुवातीपासूनच हा प्रकल्प आर्थिकदृष्टय़ा तोटय़ात आहे. मुंबईत २०१४ मध्ये घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा हा पहिला मेट्रो मार्ग सुरू झाला. त्याला प्रतिसादही चांगला मिळतो. मात्र, तरीही आर्थिकदृष्टय़ा हा प्रकल्प तोटय़ातच सुरू आहे. कोची शहरात पाच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या मेट्रोचीही तीच गत. प्रतिदिन साडेतीन लाख प्रवासी अपेक्षित असताना फक्त ६० ते ६५ हजारच प्रवासी या सेवेचा वापर करतात. चेन्नई किंवा हैदराबाद शहरांमध्येही हीच परिस्थिती आहे. अपवाद फक्त 'नम्मा बंगळूरु' मेट्रो प्रकल्पाचा. यंदाच्या वर्षांत या मेट्रोला प्रथमच चागंला महसूल मिळाला आहे. दिल्ली, मुंबई आणि बंगळूरु हे ऑपरेशनल फायद्यात असले तरी प्रकल्प म्हणून तोटय़ात आहेत. हैदराबाद शहरातील खासगीकरणाचा प्रयोगही यशस्वी ठरलेला नाही.

### सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कोंडी

मेट्रो ही तोटय़ात चालणारी एकमेव सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नाही. मात्र, उभारणीस स्वस्त असूनही मेट्रोला तोटा का सोसावा लागतो, याचा विचार करणे गरजेचे आहे. अनेकदा राजकीय फायद्यासाठी मेट्रोची मागणी होताना दिसते. राज्यकर्ते प्रकल्प मंजूर करतात पण प्रत्यक्ष ही सेवा व्यवहार्य ठरत नाही, असेही अनुभवास येते. नागपूर आणि पुण्यात प्रवाशांचा प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी असतानाही सुरू केलेल्या मेट्रो मार्गाचे उदाहरण ताजे आहे. वाढत्या नागरीकरणात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था शासकीय यंत्रणांना तोटय़ात चालवावी लागते पण हा तोटा किती सहन करायचा याचाही विचार व्हायला पाहिजे. मुंबईतील 'बेस्ट' सेवा किंवा राज्य परिवहन मंडळाची (एस.टी.) सेवा या दोन्ही तोटय़ात गेल्या आहेत हे बोलके उदाहरण आहे. सरकारी किंवा पालिकेच्या अनुदानावर या दोन्ही यंत्रणांनी तग धरला आहे. मेट्रोचे मुंबईच्या विविध भागांमध्ये जाळे विणण्यात येत असले तरी प्रवाशांचा प्रतिसाद किती लाभेल आणि त्यातून आर्थिक तोटा वाढणार नाही ना, याची चिंता आतापासूनच मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना भेडसावत आहे.

### 'मेट्रो १'ची दिवाळखोरी

मुंबईभर मेट्रोचे जाळे विणले जात असताना घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा हा 'मेट्रो १' मार्ग सुरू होऊन नऊ वर्षे पूर्ण झाली. मात्र, चांगला प्रतिसाद मिळूनही नफ्याअभावी ही मेट्रो दिवाळखोरीत गेली आहे. या मार्गिकेच्या आराखडय़ानुसार २०२१ पर्यंत दिवसाला ६ लाख ६५ हजार प्रवासी प्रवास करतील असा दावा केला जात होता. प्रत्यक्षात सध्या प्रवाशांची दैनंदिन संख्या अंदाजे ३ लाख २५ हजार ते तीन लाख ४० हजारांच्या घरात आहे. म्हणजेच अपेक्षित प्रवासी संख्येच्या तुलनेत ५० टक्के प्रवासीही मेट्रोचा वापर करत नसल्याचे दिसत आहे. साहजिकच याचा परिणाम मेट्रो १च्या उत्पन्नावर होऊन ती दिवाळखोरीत गेल्याची वेळ आली.


# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. व.वि.श.म /क.वि/१२९७/२०२३-२४

दिनांक - १५/०९/२०२३

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोपारा-२ | NL३२/३९४/६ | २६६६ | कामील रफिक नाजे व बंधु | फैयाज रशिद खान |
| २ | समेळ-१ | NL०८/२७४/२३ | २६९४ | फिरदोस फिरोज खान | मक्की मोहम्मद झिकरुल्लाह |
| ३ | समेळ-२ | NL०९/५५/२७ | २६९६ | के. नानुकुट्टन | जितेंद्र नंदकुमार सिंह व रंजू जितेंद्र सिंह |
| ४ | समेळ-१ | NL०८/२५७/३८ | २६८८ | मुखत्यार इब्राहिम चिंदे | शकील अली अंसारी / जुलेखा खातून शकील अंसारी |
| ५ | समेळ-२ | NL०९/१००/२६ | २६८६ | नईम सईद थोंबल | नालिनी पवार |
| ६ | सोपारा-२ | NL३२/६२४/७ | २६९० | हर्ष कंन्स्ट्र. | पोपट महादू करंडे |
| ७ | सोपारा-२ | NL३२/४६३/२७ | २६९२ | झरे एन्ड कुरेशी | शकील अहमद शेख/बिलकिस शकील अहमद शेख |
| ८ | सोपारा-१ | NL३१/९७/९ | ३०८६ | क्रिश डेव्ह. | जयश्री अजय शर्मा व अजय मदनलाल शर्मा |
| ९ | समेळ-२ | NL०९/६३/३३ | ३०७२ | एस प्रकाश | दत्तात्रय जयसिंग पाटील |
| १० | समेळ-१ | NL०८/२१६/१६ | ३०८० | विकास साटम | गणेश वसंत तांबे |
| ११ | सोपारा-२ | NL३२/५९१/३५ | ३०७४ | साबेरा मोहम्मद युनुस शेख | समिना बानू मोहम्मद युनुस खान |
| १२ | सोपारा-२ | NL३२/४९९/१८ | ३०७८ | सुरेखासु. गाणेकर /स्नेहासु. गाणेकर | महेंद्र शांताराम लटकेव दिप्ती महेंद्र लटके |
| १३ | सोपारा-२ | NL३२/५२६/४९ | ३०५४ | अब्दुल अजीज कादर शेख | अब्दूल हमीद गुलाम हुसैन शेख व तबस्सूम अब्दुल हमीद शेख |
| १४ | सोपारा-२ | NL३२/५९१/३४ | ३०४८ | साबेरा मोहम्मद युनुस शेख | समिना बानू मोहम्मद युनुस खान |
| १५ | सोपारा-१ | NL३१/१२८/२० | ३०३१ | जय बिल्डर्स डेव्ह. | जाहीद ईजाज उलहक शेख / शमा खातूनजाहिद शेख |
| १६ | सोपारा-२ | NL३२/५९३/१३ | ३०५० | स्वत: | सबिहा मुसाविर पठाण |
| १७ | समेळ-१ | NL०८/९९/२९ | २९६६ | मोहम्मद उमर मोहम्मद दरहीम | नमीम रफिक शेख |
| १८ | सोपारा-२ | NL३२/५८८/३९ | ३०३६ | जरिना बासिर खान | अफरोज बेगम मो. साबीर शेख व मा. साबीर मो. अयुब शेख |
| १९ | सोपारा-१ | NL३१/१६०/२९ | २९९६ | रामकैलाश के यादव | रसिका वैभव वेळासकर |
| २० | समेळ-२ | NL०९/९४/७ | २९९९ | विनोद शिवराम कांबळे | अशोक विठ्ठल चव्हाण / सुनिता अशोक चव्हाण |

(निता कोरे)
प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा


# जाणून घेवू नागरी संरक्षण दल!

## आपत्ती समयी मदत व बचाव कार्य करण्यासाठी तत्परतेने धावून जाणारे शासकीय स्वयंसेवी दल

नागरी संरक्षण दल, नवी मुंबई समूह, ठाणे शहरामध्ये नागरी संरक्षण संघटना सन १९७१ पासून कार्यरत असून या शहरामध्ये नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती आल्यास नागरिकांच्या जीवित व वित्त संरक्षणासाठी नागरी संरक्षण उपाययोजना अंमलात आणल्या जातात. या आपत्ती टाळता येऊ शकत नसल्या तरी नियोजनाद्वारे त्यांची तीव्रता कमी करता येते किंवा त्याची परिणामकारकता कमी करता येऊ शकते. यासाठी सामूहिक प्रयत्नांची व व्यवस्थापनाची गरज आहे.

भारतात प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तीमध्ये अतिवृष्टी, भूकंप, वणवा, दरड कोसळणे, चक्रीवादळ, वीज पडणे तसेच मानवनिर्मित आपत्तीमध्ये आग लागणे, इमारत कोसळणे, वायू गळती, साथीचे रोग, औद्योगिक - रासायनिक अपघात इत्यादींचा समावेश होतो. नैसर्गिक आपत्ती येणे आपल्या हातात नसले तरी त्यांची तीव्रता कमी करणे शक्य आहे आणि भविष्यात त्यापासून होणारे नुकसान व परिणाम होऊ नयेत, याकरिता योग्य नियोजन करता येते.

ठाणे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची आपत्ती आल्यास आपत्तीच्या काळात संदेश/माहिती मिळताच संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच नियंत्रक व जिल्हादंडाधिकारी, नागरी संरक्षण, ठाणे यांच्या आदेशान्वये त्वरीत मदत व बचाव कार्य करण्यासाठी घटनास्थळी पोहोचणे अभिप्रेत आहे.याकरिता प्रमाणित कार्यपद्धती (एस.ओ.पी.) निश्चित केलेली आहे. त्याप्रमाणे कार्य अपेक्षित आहे.

सन १९६१ पासून ठाणे शहरात नागरी संरक्षण दलाची स्थापना झाली आहे. जिल्हादंडाधिकारी व नियंत्रक, नागरी संरक्षण, नवी मुंबई समूह ठाणे हे या संघटनेचे विभाग प्रमुख असून, उपनियंत्रक नागरी संरक्षण, नवी मुंबई समूह, ठाणे हे कार्यालय प्रमुख आहेत.

उपनियंत्रक 14 नागरी संरक्षण कार्यालय, मुख्य नियंत्रण कक्ष, कल्याण तहसिलदार कार्यालयाच्या आवारामध्ये व उप मुख्य नियंत्रण कक्ष, सिद्धार्थ नगर, अंबरनाथ (पश्चिम) येथे आहे. या ठिकाणी एकूण वैतनिक अधिकारी व कर्मचारी विभागून कर्तव्यावर असतात. या कार्यालयाकडे एक बोलेरो जीप, एक रुग्णवाहिका अशी शासनाने दिलेली वाहने आहेत. या वाहनांचा वापर आपत्कालीन परिस्थितीत वापर करण्यात येतो.

सन १९७१ ते एप्रिल १९८६ पर्यंत कल्याण / अंबरनाथ व ठाणे ही शहरे नागरी संक्षण शहर म्हणून अस्तित्वात होती. त्यावेळी सुध्दा ठाणे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात मुख्य नियंत्रण केंद्र जिल्ह्याचे ठिकाणी म्हणून अस्तित्वात होते. तसेच कल्याण येथे उप नियंत्रण केंद्र कार्यरत होते. ठाणे शहरात हवाई हल्ला धोका सूचना देण्यासाठी १७ विद्युत सायरन अस्तित्वात होते, तसेच ठाणे ते मुख्य नियंत्रण केंद्र मुंबई दरम्यान हॉट लाईन कार्यरत होती.

एप्रिल, १९८६ रोजी नागरी संरक्षण ठाणे शहर भारत सरकार पत्र क्र.८/11011/183/ सीडीसीडी(सी.डी.) ने ठाणे शहर नागरी संरक्षण शहराच्या यादीतून वगळण्यात आले, तेव्हापासून कल्याण तहसिलदार कार्यालयामागे सर्व्हे नं. प्लॉट वर नागरी संरक्षण कार्यालयातर्फे बांधकाम करुन कल्याण उप नियंत्रण केंद्राचे मुख्य नियंत्रण केंद्रात रूपांतर केले व आवश्यक ते दूरध्वनी १०० वॅट एच.एफ. सेट, हॉट लाईन हवाई हल्ला धोका सूचना यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत.

संचालक, नागरी संरक्षण ना.सं./५/२३/९५, दि. २६ सप्टेंबर १९९५ नुसार नागरी संरक्षण कल्याण अंबरनाथ ऐवजी नवी मुंबई समूह, ठाणे वर्ग-१ म्हणून घोषित करण्यात आले असून अंतर्गत प्रमुख शहरे म्हणून ठाणे-कल्याण-उल्हासनगर-अंबरनाथ-नवी मुंबई व बेलापूर औद्योगिक पट्टा यांचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच ठाणे महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका इत्यादी ठिकाणचा समावेश केल्याने ठाणे हे ठिकाण मध्यवर्ती ठिकाण असल्याने नागरी संरक्षण शहराच्या आराखडयात ठाणे येथे मुख्य नियंत्रण केंद्र निर्देशित केले आहे.

नागरी संरक्षण दल, ठाणे येथील कार्यालयीन जागांची माहिती
कार्यालयाचे नाव –
उप नियंत्रक, नवी मुंबई समूह, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, 5 वा मजला, रुम नं. 504, ठाणे. दूरध्वनी क्रमांक-022-25432288
मुख्य नियंत्रण कक्ष, कल्याण, तहसिलदार कार्यालय मागे, मुरबाड रोड, महात्मा फुले चौक, कल्याण (प.). दूरध्वनी क्रमांक-022-25432288,0251-2317578/ 2313295/2313263
उप नियंत्रण कक्ष अंबरनाथ, पाणीपुरवठा कार्यालयासमोर, पंप हाऊस, अंबरनाथ (प.) दूरध्वनी 0251-2684073/ 264074.
सध्या नागरी संरक्षण दल, उप नियंत्रक, नवी मुंबई समूह, ठाणे या पदाची धुरा श्री. विजय जाधव हे सांभाळीत आहेत.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

पोलीस बातमी पत्र



# गोळीबार करून सासरच्या मंडळीनी के ली विवाहितेची हत्या; पतीसह ६ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल

ठाणे : पतीसह सासरच्या मंडळीनी विवाहितेचा छळ करून तिच्यावर बंदुकीतून गोळीबार करत तिला ठार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना शहापूर तालुक्यातील अजनुप ग्रामपंचायत हद्दीतील बोंडरपाडा येथील मृतक सासरी राहत असलेल्या घरात घडली आहे. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या सहा जणांच्या विरोधात हत्येसह विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. रंजना शिवा भवर (वय २७) असे गोळीबारात ठार झालेल्या विवाहितेचं नाव आहे. तर पती शिवा भवर, सासू सावित्री भवर, सासरे काळू भवर, गजमल भवर, आत्या भवर, बेंडू भवर अशी गुन्हा दाखल झालेल्या सासरच्या सहा



जणांची नावे आहेत. मारहाण आणि शिवीगाळ - मिळालेल्या माहितीनुसार मृतक रंजना शहापूर तालुक्यातील नांदगाव चिंचपाडा येथे राहणारी होती. तिचा विवाह शहापूर तालुक्यातील अजनुप ग्रामपंचायत हद्दीतील बोंडरपाडा येथील शिवा भवर याच्याशी २८ एप्रिल २०१८ रोजी झाला. त्यानंतर वर्षभर सुखाचा संसार सुरू असतानाच आरोपी पती हा मृतक पत्नीला घर खर्चासाठी पैसे माहेरुन घेऊन ये असा असा तगादा लावत तिला मारहाण आणि शिवीगाळ करत होता. त्यातच विवाह झाल्यानंतर दोघांना दोन मुले झाली असून एक मुलगी साडेतीन वर्षाची आहे. तर मुलगा दीडवर्षाचा आहे. अशातच सासरची मंडळी अधिक छळ करीत असल्याने मृतक रंजनाने २०२२ मध्ये विष घेतलं होतं. मात्र त्यावेळी तिच्यावर तातडीनं उपचार केल्याने ती बरी झाली होती. त्यानंतर दोन मुलांना घेऊन ती माहेरी राहात होती. त्यानंतर सासरच्या मंडळींनी तिला पुन्हा समजूत काढून सासरी आणले होते. गोळ्या घालून रंजनाची हत्या - मात्र काही दिवसात पुन्हा सासरच्या मंडळीकडून विविध घरगुती कारणावरून नाहक छळ केला जात होता. त्यामुळे माहेरी फोन करून आई वडील अथवा भावाला सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या छळाची माहिती मृतक देत होती. यामुळे सासरच्या मंडळींचा मृतक रंजनाशी १९ सप्टेंबर रोजी रात्रीच्या साडे नऊ वाजल्याच्या सुमारास वाद होऊन सासरच्या मंडळींनी छऱ्याच्या बंदुकीने गोळ्या घालून रंजनाची हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच शहापूर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या खर्डी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर घटनास्थळी पंचनामा करत रंजनाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शहापूर उपजिल्हा रुग्णालयातून आज सकाळी मुंबईतील जे. जे. रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. गुन्हा दाखल - मृतकाचा भाऊ पांढरी नवसू केवारी (वय ३०) याच्या तक्रारीवरून तिच्या पतीसह सासरच्या सहा जणांच्या विरोधात (आज) २० सप्टेंबर रोजी शहापूर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२, ४९८(अ) ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक अनंत पराड करीत असल्याची माहिती पोलीस ठाण्यातून देण्यात आली आहे.

# आधी पत्नीला संपवलं, नंतर स्वतः घेतला गळफास; सुखी संसाराचा भयंकर शेवट

नांदेड : जिल्ह्यातील किनवट तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली. आधी पत्नीची हत्या (murder) करून नंतर स्वतः गळफास घेऊन एकाने आत्महत्या (suicide) केली. राहत्या घरात पत्नीची हत्या करून पत्तीनेच लायलोन दोरीने गळफास घेतल्याने खळबळ उडाली आहे. आज (20 सप्टेबर) रोजी सकाळी साडेआठ वाजल्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. एकाचवेळी पती-पत्नीची मृतदेह आढळून आल्याने पपरिसरात मात्र खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन, पंचनामा केला. दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. रूपाली मारुती भालेराव (29 वर्ष रा. भिसी, किनवट) असे हत्या करण्यात आलेल्या महिलेचं नाव असून,




मारोती विठ्ठल भालेराव (वय 35 वर्ष, रा.भिसी, किनवट) असे आत्महत्या करणाऱ्या पतीचं नाव आहे. रूपाली आणि मारोती यांचे काही वर्षांपूर्वी लग्न झाले होते. दरम्यान, सर्व काही सुरळीत सुरु असतानाच आज सकाळी साडेआठच्या सुमारास रूपाली आणि मारोती यांचा राहत्या घरात मृतदेह आढळून आला. दरम्यान, याची माहिती मिळताच इस्लापूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक उमेश भोसले यांनी कर्मचाऱ्यासह घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी त्यांनी पाहणी केली असता 29 वर्षीय विवाहित महिलेचा मृतदेह लाकडी पलंगावर आढळला. तर पतीचा मृतदेह लायलोन दोरीने गळफास घेवून लटकलेल्या अवस्थेत आढळला. त्यामुळे आधी पत्नीची हत्या करून, करून त्यानंतर पतीने हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांना आहे. त्यामुळे पोलिसांनी घटनेचा पंचनाम केला असून, पुढील तपास करण्यात येत आहे.

# शाळा प्रशासनाच्या त्रासाला कंटाळून मुख्याध्यापिकेची आत्महत्या; अध्यक्ष, सचिवास चौघांवर गुन्हा दाखल

यवतमाळः सेवानिवृत्तच्या केसवर सही करणार नाही, म्हणून मानसिक त्रास आणि वारंवार अपमानित करण्यात येत असल्याने मुख्याध्यापिकेने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना यवतमाळमध्ये घडली. भांब राजा येथील नेहरू महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिकेने हे टोकाचं पाऊल उचललं. यानंतर विद्यालयाचे अध्यक्ष आणि सचिवासह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर विद्यार्थी आणि पालकवर्ग तसेच या परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शाळेचे अध्यक्ष, सचिवासह चौघांवर गुन्हा दाखल या प्रकरणी मृत मुख्याध्यापिकेच्या मुलीने दिलेल्या तक्रारीवरुन यवतमाळच्या लोहारा पोलीस ठाण्यात भांब राजा येथील नेहरू महाविद्यालयाच्या अध्यक्ष, सचिवासह चौघांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मंगला रमेश ढवळे असं मृत



मुख्याध्यापिकेचं नाव आहे. तर अध्यक्ष किसन जयस्वाल, सचिव निलेश चव्हाण, लिपिक अक्षय जयस्वाल आणि सहाय्यक शिक्षक अरुण जाधव अशी गुन्हा नोंद करण्यात आलेल्या चौघांची नावं आहेत. मुलगी मोनिका चंदनखेडे (रा. विश्वकर्मा नगर, नागपूर) हिने यवतमाळच्या लोहारा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. यानंतर प्रकरणातील दोषींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्याध्यापिका 26 वर्षांपासून होत्या शाळेत कार्यरत मृतक मुख्याध्यापिका मंगला ढवळे या भांबराजा येथील नेहरू महाविद्यालयात सन 1997 पासून शिक्षक पदावर कार्यरत होत्या. तर, 2018 पासून त्या विद्यालयात मुख्याध्यापिका पदावर कार्यरत होत्या. तर मंगला ढवळे या 31 ऑगस्ट 2023 रोजी सेवानिवृत्त होणार होत्या. नेमकं घडलं काय? मुख्याध्यापिका मंगला ढवळे यांनी महाविद्यालयातील लिपिक अक्षय जयस्वाल याला 15 एप्रिल 2023 रोजी 50 हजार रुपये उसनेवारी दिले होते, त्यापैकी 40 हजार रुपये त्याने मुख्याध्यापिका मंगला ढवळे यांना परत दिले. मात्र उर्वरित 10 हजार रुपये देण्यासाठी तो आज देतो, उद्या देतो म्हणून पैसे देणं टाळू लागला. त्याला पैसे परत मागितले असता तो मुख्याध्यापिकेला अपमानित करत होता. तर, महाविद्यालयातील सचिव निलेश चव्हाण आणि अध्यक्ष किसन जयस्वाल हे मुख्याध्यापिका मंगला ढवळे यांच्या सेवानिवृत्तीच्या फाईलवर सह्या करण्यास तयार नव्हते. आम्ही तुमच्या पेन्शन केसवर सही करणार नाही. असं म्हणत हे सगळे मुख्याध्यापिकेला मानसिक त्रास देऊ लागले. याच त्रासाला कंटाळून मुख्याध्यापिका मंगला ढवळेंनी आत्महत्या केली.

# डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे नवजात बालकाचा मृत्यू, डॉक्टरांवर गुन्हा दाखल, बारामती शहरातील धक्कादायक घटना

पुणे : बारामती शहरात धक्कादायक घटना घडली आहे. महिलेच्या प्रसूतीवेळी दवाखान्यात डॉक्टर उपस्थित नसल्याने नवजात बालकाचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी बारामतीतील डॉक्टरवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. बारामतीतील डॉ तुषार गोविंद गदादे असे गुन्हा नोंद झालेल्या संशयित डॉक्टर आरोपीचे नाव आहे.



**नेमकं काय घडलं?**

22 डिसेंबर 2022 रोजी पद्मिनी गोपाळ गायकवाड यांना नववा महिना चालू असल्याने गदादे डॉक्टरांकडे गेल्या होत्या. त्यावेळी डॉक्टरांनी त्यांना प्रसूतीसाठी गायकवाड यांना हॉस्पीटलमध्ये प्रसुतीसाठी ॲडमिट करून घेतले. गायकवाड यांना ॲडमिट करून डॉक्टर बाहेर निघून गेले. त्यांचे गैरहजेरीत त्यांनी आर्हताधारक डॉक्टर किंवा नर्स उपलब्ध ठेवले नाहीत. डॉक्टरांनी निष्काळजीपणा केल्यामुळे नवजात अर्भकाचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशनमध्ये भादवि का क 304 (अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**डॉक्टरांचा हलगर्जीपणा...**

आतापर्यंत आपण प्रसुतीदरम्यान बाळ दगावल्याच्या बातम्या ऐकल्या होत्या. त्यानंतर डॉक्टरांवर वेगवेगळे आरोपही होताना आपण पाहिले आहे. त्यामुळे डॉक्टरांचा हलगर्जीपणा कायम समोर आला आहे.

तरीही डॉक्टर अनेकदा आरोप फेटाळून लावतात. मात्र यावेळी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच हे बाळ दगावल्याचं स्पष्ट आहे. आपल्या अनुपस्थितीत पर्यायी सोय उपलब्ध न करुन देता रुग्णालयात अनुपस्थित राहिल्याने बाळाचा मृत्यू झाला. त्यामुळे कुटुंबियांनी थेट डॉक्टरांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी डॉक्टरांवर गुन्हा दाखल केला आहे.

**कुटुंबियांचा आनंद हरपला...**

बारामतीतील गायकवाड कुटुंबाला मागील नऊ महिन्यांपासून बाळाची चाहूल लागली होती. हे कुटुंबीय आतुरतेने घरात दुडगुडणाऱ्या बालाची बाट बघत होतं. गदादे दाम्पत्यही आई- वडिल होण्याची स्वप्न रंगवत होते. घरात आनंद येणार होता.

कुटुंबातील सगळेच बाळाच्या स्वागतासाठी मोठी तयारी करत होते. आता काही दिवसांत आणि गणपती दरम्यान घरात बाळाचं आगमन होणार होतं. मात्र डॉक्टरांच्या एका हलगर्जीपणामुळे गायकवाड कुटुंबियांवर शोककळा पसरली. कुटुंबीय आणि नातेवाईक संतापले...

डॉक्टरांच्या या कृत्यामुळे गायकवाड कुटुंबीय आणि नातेवाईकांनी चांगलाच संताप व्यक्त केला. डॉक्टरांविरोधात तातडीने तक्रार केली शिवाय त्यांच्यावर योग्य कारवाई करण्याची मागणीदेखील कुटुंबीयांनी केली आहे. त्यामुळे आता पोलीस नेमकी कोणती कारवाई करणार, हे पाहणं महत्वाचं असणार आहे.

# मुंबईवर दहशतवादी हल्ल्याचं सावट! पोलिसांना धमकीचा फोन, यंत्रणा अलर्ट मोडवर

मुंबई : महाराष्ट्राची राजधानी मुंबईवर दहशतवादी हल्ल्याचं सावट असल्याचा धमकीचा फोन आला आहे. मुंबई पोलीस ट्रोलला धमकीचा फोन आला आहे. मुंबईत काही लोक बॉम्ब बनवत असून आणि हल्ल्याच्या तयारीत आहेत, अशी माहिती एका निनावी व्यक्तीने कंट्रोल रूमला फोन करून दिली. यानंतर यंत्रणा हा अलर्ट मोडवर आल्या आणि या फोननंतर मुंबई पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला. मुंबई पोलिसांना धमकीचा फोन मुंबई पोलिसांच्या कंट्रोल रुमला धमकीचा फोन आला होता. यानंतर हा फोन आणि या व्यक्तीचा




शोध सुरु झाला. दरम्यान, पोलिसांनी तपास केला असता, फोन करणाऱ्याने दारूच्या नशेत हा कॉल केल्याचे निष्पन्न झालं. कॉल करणाऱ्या व्यक्तीला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. अनेक वेळा धमकीचे फोन मुंबई पोलिसांना यापूर्वीही अनेकदा धमकीचे फोन आले आहेत. अनेकदा असे फेक कॉल येत असतात. यापूर्वी 31 ऑगस्ट रोजी मंत्रालय उडवून देण्याची धमकी देणारा फोन आला होता. यानंतर, मुंबई पोलिसांनी या प्रकरणी शोधमोहीम राबवली असता, धमकीचा फोन अहमदनगर जिल्ह्यातील रहिवासी बाळकृष्ण भाऊसाहेब ढाकणे नावाच्या व्यक्तीने केल्याचं आढळून आलं. ट्रेनमध्ये सीरियल बॉम्बस्फोटाची धमकी त्याआधीही मुंबई कंट्रोल रुमला अनेक वेळा दहशतवादी हल्ल्याची धमकी देण्यात आली होती. 6 ऑगस्ट रोजीही मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला धमकीचा फोन आला होता. मुंबईत ट्रेनमध्ये सीरियल बॉम्बस्फोट होणार असल्याची माहिती संबंधित व्यक्तीने दिली होती. जुहूच्या विलेपार्ले परिसरातून फोन करत असल्याचे सांगून कॉलरने फोन बंद केला. पोलिसांनी संबंधित व्यक्तीच्या फोनचे लोकेशन ट्रेस केले असता त्याने जुहू येथून फोन केल्याचे निष्पन्न झालं. त्यानंतर या व्यक्तीला अटक करुन त्याची चौकशी करण्यात आली होती. महत्त्वाचं म्हणजे जुलै महिन्यातही मुंबई पोलिसांना असे धमकीचे फोन आले होते, यावेळी 26/11 हल्ल्याची पुनरावृत्ती करण्याची धमकी देण्यात आली होती. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सुरक्षा व्यवस्थेबाबत सतर्क राहण्याची सूचना संबंधित पोलीसांना दिल्या.

# मेडिकल चालकाकडून तब्बल 19 हजारांवर नशेच्या गोळ्यांची विक्री; अन्न औषध प्रशासन विभागाच्या कारवाईनंतर खळबळ

धाराशिवः नशेच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या एका मेडिकल चालकावर अन्न औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईनंतर धाराशिव जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. उमरगा येथील मेडिकल दुकानामधून झोपेची औषधे डॉक्टरांच्या सल्ल्याविना विकली जात असल्याची माहिती अन्न औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्यानंतर या मेडिकल दुकानात पोलीस व अन्न औषध प्रशासन विभागाच्या संयुक्त पथकाने धाड टाकून 1 लाख 40 हजार रुपयाचा अवैध औषधसाठा जप्त केला आहे. विशेष म्हणजे या



मेडिकल चालकाने आतापर्यंत 19 हजारांवर नशेच्या गोळ्यांची विक्री केल्याचे तपासात समोर आले आहे. तर, या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात मेडिकल दुकानदाराविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गणेश गोविंद माने असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धाराशिवच्या उमरगा येथे गणेश गोविंद माने यांचे आर्या मेडिकल ॲन्ड जनरल स्टोअर्स हे दुकान आहे. या दुकानातून निट्रावेट हे झोपेचे औषध डॉक्टरांच्या सल्ल्याविना व कोणत्याही चिठ्ठीशिवाय विक्री होत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाकडून या मेडिकल दुकानची तपासणी करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आलेल्या या चौकशीत प्रीस्क्रिप्शनशिवाय बिल न देता झोपेच्या औषधाची विक्री केली जात असल्याचे समोर आले.

# ३,००० रुपयांसाठी नग्न करून काढली धिंड; माणुसकीला काळिमा फासणारा घटनाक्रम वाचून व्हाल सुन्न



३,००० रुपयांचे कर्ज परत न केल्याने माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडल्याचे समोर येत आहे. नोएडा येथे भाजी विक्रेत्याला बेदम मारहाण करून बाजारात नग्न धिंड काढण्यात आली आहे. याचा व्हिडीओ सुद्धा सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली. इंडिया टुडेच्या माहितीनुसार, नोएडा सेक्टर ८८ मंडीमध्ये ही घटना घडली असल्याचे समजतेय. व्हिडिओमध्ये, एका व्यक्तीला काही जण लाठीने मारहाण करताना, नंतर विवस्त्र करून बाजारात धिंड काढताना दिसत आहेत. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नोएडा पोलिसांनी हस्तक्षेप करत पीडिताच्या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल केला.

# कल्याण-डोंबिवलीत खड्डे, खडीतून गणपती बाप्पांचा प्रवास

कल्याणः गेल्या महिन्यात पावसाने २५ दिवस दडी मारली होती. त्यावेळी रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची कामे हाती घेण्याऐवजी कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन गप्पगार बसले. आता गणेशोत्सावाच्या तोंडावर रस्ते सुस्थितीत आणि खड्डे बुजविण्याची कामे सुरू केल्यावर पावसाने हजेरी लावली. त्यामुळे खड्डे बुजविताना ठेकेदाराला कसरत करावी लागते. या कसरतीत शहरांमधील रस्त्यांवरील खड्डे कायम आहेत. या खड्ड्यांमधून गणपती बाप्पांना प्रवास





करावा लागणार आहे. डोंबिवली, कल्याणमध्ये खड्डे बुजविण्याची कामे खडी आणि सिमेंट, मातीचा गिलावा टाकून करण्यात येत आहेत. पावसामुळे खड्ड्यात पाणी साचून ओलावा रस्त्यावर आला आहे. वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे खड्ड्यातील खडी रस्त्यावर पसरली आहे. या खडीवरुन दुचाकी वाहने घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. गणेशोत्सवाच्या काळात गणपती बाप्पांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून आयुक्त डाॅ. भाऊसाहेब दांगडे यांनी डोंबिवली, कल्याण शहरातील रस्ते सुस्थितीत करण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. पावसामुळे त्या आश्वासनावर पाणी फिरले आहे. रस्तोरस्ती पालिकेचे ठेकेदार, अभियंते खड्डे सुस्थितीत करण्यासाठी, खड्डे भरणीसाठी उभे आहेत. परंतु, पावसाच्या मुसळधार सरी कोसळत असल्याने ठेकेदार, अभियंत्यांची तारांबळ उडत आहे. टिटवाळ्यात भर पावसात डांबर टाकून खड्डे भरणीची कामे सुरू होती.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898